**प्रकल्प प्रवर्तक मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड (युटीसीएल), बी विंग, आहुरा सेंटर, पहिला मजला, महाकाली लेणी रस्ता, अंधेरी पूर्व, मुंबई – 400 093 महाराष्ट्र यांच्या तारसा, आष्टी आणि नवेगाव या गावातील, तालुका-मौदा, जिल्हा-नागपूर, महाराष्ट्र येथे स्टँड अलोन (स्वतंत्र) ग्राईडिंग युनिटच्या सिमेंट उत्पादन विस्तारिकरण 2.0 दशलक्ष टीपीए वरुन 5.4 दशलक्ष टीपीए प्रकल्प उत्पादन प्रकल्पाच्या उभारणीच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २६/१०/२०२३ |
| वेळ | : | सकाळी ११.०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ –<br>मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड (युटीसीएल),<br>गांव- तारसा, आष्टी आणि नवेगाव,<br>तालुका-मौदा, जिल्हा-नागपूर, महाराष्ट्र |

**प्रस्तावनाः-**

प्रकल्प प्रवर्तक मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड (युटीसीएल), बी विंग, आहुरा सेंटर, पहिला मजला, महाकाली लेणी रस्ता, अंधेरी पूर्व, मुंबई – 400 093 महाराष्ट्र यांच्या तारसा, आष्टी आणि नवेगाव, तालुका-मौदा, जिल्हा-नागपूर, येथील स्टँड अलोन (स्वतंत्र) ग्राईडिंग युनिटच्या सिमेंट उत्पादन विस्तारिकरण 2.0 दशलक्ष टीपीए वरुन 5.4 दशलक्ष टीपीए प्रकल्प उत्पादन प्रकल्पाच्या उभारणीच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील 10.0 कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (State Environment Impact Assessment Authority-SEIAA), पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी टी.ओ.आर. दिनांक 13-3-2023 रोजी मान्यता दिलेली आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, 2006 नुसार प्रकल्प स्थानाच्या 10 कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व य त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले. तसेच सदरहू प्रकल्प हा "संवर्ग बी" शेड्युल 3 (साहित्य / माल उत्पादन)- सिमेंट प्रकल्पमध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण (State Environment Impact Assessment Authority-SEIAA), पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे.

प्रकल्प प्रवर्तक मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड (युटीसीएल), यांच्या तारसा, आष्टी आणि नवेगाव, तालुका-मौदा, जिल्हा-नागपूर, महाराष्ट्र येथे स्टँड अलोन (स्वतंत्र) ग्राईडिंग युनिटच्या सिमेंट उत्पादन विस्तारिकरण 2.0 दशलक्ष टीपीए वरुन 5.4 दशलक्ष टीपीए प्रकल्प उत्पादन प्रकल्पाच्या उभारणीच्या पर्यावरणविषयक प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांना पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक 25 ऑगस्ट, 2023 रोजी अर्ज सादर केला.

म.प्र.नि.मंडळ नागपूर व जिल्हाधिकारी, नागपूर यांच्या समन्वयाने दिनांक २६/१०/२०२३ रोजी प्रत्यक्ष (physical) पध्दतीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थळ मे. अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड (युटीसीएल), गांव- तारसा, आष्टी आणि नवेगाव, तालुका-मौदा, जिल्हा-नागपूर, महाराष्ट्र येथे आयोजित करण्यास मान्यता दिली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, 2006 नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या 30 दिवस अगोदर (म्हणजे जनसुनावणी दिनांक 26-10-2023 च्या 30 दिवस अगोदर) जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, नागपूर-2 म.प्र.नि.मंडळ नागपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत, नागपूर एडिशन यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र हितवाद, नागपूर एडिशन यात इंग्रजीत दिनांक 22-09-2023 रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती (**सहपत्र-१**). त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक नागपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय, नागपूर-2, यांना दोन निवेदने प्राप्त झालेली आहेत (**सहपत्र-२**).

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होताः-

1) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य क्षेत्र, पर्यावरण, वने एवं जलवायू परिवर्तन मंत्रालय, भू-तल, पूर्व खंड, नविन सचिवालय भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर – 440 001
2) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, 15वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -400 032
3) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, 3रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई – 400 022

4) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, 5 वा मजला,सिव्हिल लाईन्स, नागपूर
5) उप प्रादेशिक कार्यालय, नागपूर – 2, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, 5 वा मजला,सिव्हिल लाईन्स, नागपूर
6) जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर,
7) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर,
8) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नागपूर,
9) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, मौदा, तालुका – मौदा, जिल्हा- नागपूर,
10) तहसीलदार, तहसील कार्यालय-मौदा, जिल्हा – नागपूर
11) मुख्याधिकारी, नगर परिषद, मौदा, जिल्हा - नागपूर,
12) पंचायत समिती कार्यालय, मौदा, तालुका – मौदा, जिल्हा- नागपूर
13) ग्रामपंचायत कार्यालय – तारसा / आष्टी / नवेगांव, तालुका – मौदा, जिल्हा- नागपूर,
14) संकेत स्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ.

वरिल अनुक्रमांक 06 ते 14 वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक 14 सप्टेंबर, 2006 च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-६८/२०२३ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (ड्बल्युपीसी) पीएच/बी-२३०९२५-एफटीएस-०३११ दिनांक २५/०९/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली (**सहपत्र-३**).

| | | |
|---|---|---|
| 1) | जिल्हादंडाधिकारी, नागपूर<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| 2) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई<br>यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर | - **सदस्या** |
| 3) | उप प्रादेशिक अधिकारी, नागपूर-2<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर | - **आयोजक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत दोन सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-2 प्रमाणे सोबत जोडलेले आहेत (**सहपत्र-४**).

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, नागपूर-2, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. नागपूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री सुभाष चौधरी, अपर जिल्हादंडाधिकारी, नागपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, सौ. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. नागपूर तथा सदस्या, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

आयोजक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्रालय, महाराष्ट्र शासन, 15वा मजला, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सादरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

आयोजक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की जे काही लेखी निवेदने/आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत, ते शासनास पाठविण्यात येतील. त्याचप्रमाणे उपस्थितांपैकी कोणाला जर फक्त लेखी निवेदन/आक्षेप नोंदवायचा असेल, तर ते म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीस हस्तांतरित करु शकतात. त्याची पोच देण्यात येईल.

श्री संजय सत्यकार, कन्हान, तालुका-पारशिवणी, जिल्हा-नागपूर यांनी सादरीकरणास सुरवात करताना आक्षेप नोंदविला की त्यांना पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाला प्राप्त झालेला नाही. आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कार्यकारी सारांश अहवाल म.प्र.नि.मंडळ नागपूर यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेला होता. श्री संजय सत्यकार यांनी आक्षेप नोंदविला की कार्यकारी सारांश अहवाल व येथील सादरीकरणात याच्यात

तफावत असते. आयोजक यांनी सादरीकरण प्रथम करुन देण्याची सूचना केली. त्यांनी सादरीकरणाची प्रत श्री संजय सत्यकार, यांना देण्याची सूचना केली.

त्यावेळी श्री संकेत झाडे, सरपंच, ग्रामपंचायत खंडाळा यांनी सांगितले ग्रामपंचायत कार्यालयात सादरीकरणाची प्रत उपलब्ध करण्यात आलेली नाही. आयोजक यांनी सांगितले की सादरीकरणाची प्रत उपलब्ध करुन देण्यात येत नाही. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध करावयाचा असतो. त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध केल्याची पोच सभेत दाखविली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सरंपच श्री संकेत झाडे, सरपंच, ग्रामपंचायत खंडाळा यांना प्रत उपलब्ध करण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सादरीकरणात कार्यकारी सारांश अहवालातीलच मुख्य मुद्‌द्यांचा समावेश असतो. त्यांनी स्वतःचा परिचय श्री के.व्ही. रेड्डी, पर्यावरण सल्लागार असा करुन दिला.

श्री संजय सत्यकार, कन्हान, तालुका--पारशिवणी, जिल्हा-नागपूर यांनी आक्षेप नोंदविला की ज्या पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार केला, त्यांनी सादरीकरण करणे अपेक्षित आहे. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यांना खाली बसण्याची सूचना करत आम्ही प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण करण्याची परवानगी दिलेली असून सादरीकरण कोण करावे हा तुमचा चॉईस असु शकत नाही. अध्यक्ष यांनी श्री संकेत झाडे, सरपंच, ग्रामपंचायत खंडाळा यांना प्रत उपलब्ध न झाल्याची नोंद घेतल्याचे सांगितले व अनावश्यक मुद्दे उपस्थित न करण्याची सूचना केली.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत सांगितले की प्रकल्प प्रवर्तकानी प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावर होणारे संभाव्य परिणाम, स्थानिक स्तरावर होणारे फायदे याची माहिती दिलेली आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले काही लेखी आक्षेप आचारसंहितेबाबत प्राप्त झालेले आहेत. आचारसंहिता ही येथील ग्रामपंचायतमध्ये लागू आहे. पण आपली पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी सूचना ही आचारसंहितेच्या अगोदरची आहे. आपली जनसुनावणी सूचना ही 22 सप्टेंबर, 2023 रोजी एक स्थानिक व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती. तर हा मुद्दा स्पष्ट करण्यात आलेला आहे. आपली ही प्रक्रिया ही आधीच सूरू झालेली आहे. तरी हा मुद्दा परत बैठकीत विचारात घेऊ नये.

त्यावेळी श्री संजय सत्यकार, कन्हान, तालुका-पारशिवणी, जिल्हा-नागपूर यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (ईआयए) हा उपलब्ध केला नाही याबाबत विचारणा केली. सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले ईआयए हा प्रारुप ईआयए असतो.

आपणास कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध करण्यात आलेल आहे. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले ईआयए संदर्भात काही आक्षेप नोंदवायचे असल्यास त्याची नोंद घेण्यात येईल. श्री संकेत झाडे, सरपंच, ग्रामपंचायत खंडाळा यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प स्थानापासून माझे गांव एक कि.मी. अंतरावर आहे. ईआयए अहवाल मला दिलेला नाही. अध्यक्ष यांनी नोंद केल्याची माहिती दिली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू दस्तावेज शासनाच्या अधिसूचित कार्यालयात म्हणजे जिल्हाधिकारी कार्यालय-नागपूर,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर, उप विभागीय अधिकारी-मौदा, तहसील कार्यालय-मौदा, नगर पंचायत, तसेच प्रकल्प ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत कार्यरत आहे, नियमाप्रमाणे त्या ग्रामपंचायतीस पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध करण्यात आला, त्यानुसार तारसा, आष्टी आणि नवेगाव,तालुका-मौदा, जिल्हा-नागपूर या ग्रामपंचायतीस पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल उपलब्ध करण्यात आलेला असून त्याची पोचपावती येथे उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला होता. म्हणजे इतर लोक, ग्रामपंचायती हे संकेत स्थळावरून व इतर अधिसूचित कार्यालयातून घेऊ शकत होता. कारण अशी भरपूर गावे असतील त्या सर्वांना प्रत उपलब्ध करुन देणे शक्य नाही. तरी आपण अधिसूचित कार्यालयातून किंवा नागपूरच्या महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यालयातून अभ्यासू शकता. आयोजक यांनी सांगितले की स्थानिक व राष्ट्रीय वृत्तपत्रात जाहिर सूचना पर्यावरण आघात अधिसुचनेनुसार तीस दिवस अगोदर प्रकाशित करण्यात आलेली होती. तीस दिवसात याबाबत आक्षेप नोंदविण्यात आलेला नाही, मात्र आपण उपस्थित केलेल्या आक्षेपाची इतिवृतात नोंद घेण्यात येईल.

उपस्थितांनी सादरीकरण हे हिंदी भाषेत केल्याने ते येथील सामान्य लोकांना कळले नाही. सादरीकरण महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत भाषेत मराठीत करणे आवश्यक होते असे मत मांडले. आयोजक यांनी स्थानिकांच्या मागणीनुसार सादरीकरण मराठीत करण्याची सूचना केली. त्यांनुसार प्रकल्प प्रवर्तकांनी सर्व सादरीकरण मराठीत केले.

मराठीत सादरीकरण करताना उपस्थितांनी चौकशी कुठे केली याबाबत विचारणा केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी त्याची आवश्यकता नसल्याचे सांगितले.

श्री सुरेश भेलकर, माजी उपसरपंच, आष्टी ग्रामपंचायत, जिल्हा-नागपूर – प्रकल्प हा प्रकल्पबाधित गावांना त्रास होणारा प्रकल्प आहे. तरी आपण प्रकल्पहबाधित लोकांच्या समस्या ऐका, त्यानंतर इतर, बाहेरिल लोकांच्या समस्या ऐका. प्रकल्प बाधीत गावे आष्टी, नवेगाव आणि तारसा ही आहेत. त्याच्याबरोबर इतर उपस्थितांनी आक्षेप घेताना सांगितले की प्रथम आमची शेती बघा, आमची संपूर्ण शेती ही उध्वस्त झालेली आहे.

श्री संकेत झाडे, सरपंच, ग्रामपंचायत खंडाळा यांनी आक्षेप नोंदविला की मे.अल्ट्राटेकला स्थानिकांच्या तक्रारीबाबत पत्र दिल्यास ते पत्रसुध्दा घेत नाहीत. उपस्थितांनी एकत्रित आक्षेप नोंदविला की अल्ट्रा-टेक त्यांच्यावर आक्षेप नोंदविल्यास खोटे आरोप व केसेस त्या व्यक्तींविषयी दाखल करतात. त्यामुळे सदर उद्योगाबद्दल गावकऱ्यांमध्ये नाराजी आहे.

अध्यक्ष यांनी उपस्थितांना आवाहन केले की आपणास जे आक्षेप मांडावयाचे आहेत, ते शांततेने मांडावेत. ज्यांच्या शेतीचे नुकसान झाले, त्यांनी ते मांडावेत, त्याची नोंद घेण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की मुद्दे शांततेने सांगितले तर ते आम्हांला समजेल. त्यावेळी बरेच उपस्थित कंपनीच्या चुकांबद्दल एकत्रितरित्या पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीस सांगत होते. त्यांनी मत मांडले की जनसुनावणी समितीने आमच्या अडचणी या गांभीर्याने घ्याव्यात. अध्यक्ष यांनी एकावेळेस एकाने बोलल्यास त्याची नोंद घेणे शक्य होईल असे सांगितले.

उपस्थितांनी एकत्रित गलका करुन सांगितले की प्रथम प्रकल्पबाधित गावांतील लोक प्रथम सूचना, आक्षेप नोंदवितील, नंतर इतर लोकांनी बोलावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणेः-**

1) **श्री ज्ञानेश्वर हेमाजी कुटे, मुक्काम-आष्टी, तालुका-मौदा, जिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | माझे म्हणणे आहे की आपण 25 सप्टेंबर, 2023 ला जनसुनावणी तारीख निश्चित केली. महाराष्ट्र शासनाच्या निवडणूक आयोगाप्रमाणे 3 ऑक्टोबर, 2023 ला आष्टी ग्रामपंचायतीस आचारसंहिता अंमलात आली. तरी अध्यक्ष यांनी या जनसुनावणीमुळे आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याबाबत लेखी पत्र त्यांच्या सहीने द्यावे, अन्यथा ही जनसुनावणी रद्द/बरखास्त झाली असे जाहिर करण्यात यावे. अध्यक्षांनी लेखी प्रत्र द्यावे याबाबत उपस्थितांनी पाठिंबा दिला. | अध्यक्ष यांनी उत्तर दिले की सदर बाबीवर या आधीच उत्तर दिले, आणि आता जनसुनावणी चालू आहे, त्यामुळे सदर जनसुनावणी ही नियमाप्रमाणेच घेण्यात येत आहे.<br>अध्यक्ष यांनी लेखी पत्र द्यावे यास उत्तर अध्यक्ष यांनी सांगितले की तुमच्या प्रश्न नोंदविलेला आहे, तुमचा प्रश्न आता संपलेला आहे, आता दुस-यांना बोलू द्यावे. त्यास श्री कुटे यांनी नकार दिला. अध्यक्ष यांनी सांगितले की. येथे लेखी पत्र देता येत नाही, तर जनसुनावणीत जनतेकडून सूचना किंवा आक्षेप लेखी स्वरुपात स्विकारले जातात. |
| 2) | तसेच आता प्रकल्प प्रवर्तक यांनी कंपनीकडून प्रदूषण होत नाही, धुरापासून काहीही होत | अध्यक्ष यांनी लेखी पत्र सादर करण्याची सूचना केली. |

| | | |
|---|---|---|
| | नाही, तर 2016 चे कंपनीकडून झालेले प्रदूषण, त्याचे पत्र समोर आहे. | |
| 3) | आपण जनसुनावणी तारीख निश्चित केली. महाराष्ट्र शासन 15 ऑगस्ट, 26 जानेवारी या दिवशी आचारसंहितेमुळे ग्रामप्रतिनिधीस बोलण्याची संधि देत नाही. तर तुमची ही जनसुनावणी त्यापेक्षा मोठी झाली का? प्रथम प्रकल्प बाधित गावे तारसा, आष्टी, नवेगाव यांचे प्रश्न प्रथम ऐकून घ्यावेत, नंतर दुस-या गावांचा विचार करावा. | सूचनेची नोंद घेण्यात आली |
| 4) | एका लोकप्रतिनिधीने ग्रामसभेची मान्यात न घेता सरपंचावर दबाव टाकून प्रकल्पाबाबत ना हरकत प्रमाणपत्र घेतलेले आहे. | सुचनेची नोंद घेण्यात आली |
| 5) | 2013 पासून येथील पर्यावरणाबाबत पत्रव्यवहार केला. आज दहा वर्षे झालेली आहेत. अजूनही एकाचेही उत्तर आलेले नाही. या पर्यावरणविषयक बैठकीत प्रकल्प बाधित तारसा, आष्टी,नवेगाव या गावातील लोकांना एकत्र बसविणे आवश्यक होते. प्रकल्प प्रवर्तकांचा प्रकल्प हा आष्टीमध्ये आहे, मात्र ते नागपूरविषयी बोलतात. | सूचनेची नोंद घेण्यात आली. तसेच प्रकल प्रवर्तकांनी आश्वासन पूर्तता करण्याचे हमी दिल |

2) **श्री चंद्रकांत राऊत, राहणार-आष्टी, तालुका-मौदा जिल्हा-नागपूरः-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावर सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावण समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| 1) | निवडणूका लागलेल्या असून काल चिन्ह मिळालेले आहे. आमची आपसात भांडणे आहेत. तुमच्या या जनसुनावणीमुळे गावात गदारोळ निर्माण होणार आहे. शासन गावातील लोकांमध्ये भांडणे लावत आहे. | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावण समिती यांनी सांगितले की ही पर्यावरणविषयव जाहिर जनसुनावणी असून प्रस्तावित प्रकल्पा फक्त पर्यावरणविषयक सूचना, आक्षे नोंदविण्यात यावेत. |
| 2) | दहा वर्षापुर्वी प्रकल्प चालू करताना जनसुनावणी घेण्यात आली, काहीही प्रश्न सुटलेले नाहीत, तर आता ही जनसुनावणी घेऊन लगेचच असे कुठले प्रश्न सुटणार आहेत? | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

3) **श्री संकेत झाडे, सरपंच, ग्रामपंचायत खंडाळा,जिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | सहा महिन्यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास पत्र दिले, त्याचे अजूनही उत्तर नाही. अल्ट्रा टेकला दिले तर ते न घेता परत करतात. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| 2) | पहिल्या प्रकल्पाची लिगल एनओसी दाखविण्यात यावी. | प्रकल्पधारकास कळविण्यात आले. |

4) **श्री भूषण शामरावजी लोहबरे,राहणारजिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| | आम्ही शेतकरी ,आमचे प्रश्न शासनासमोर मांडण्यास सक्षम. इतरांनी मधे बोलू नये. प्रथम आपण आमच्या शेतात यावे व कंपनीमुळे आमचे जे नुकसान झाले, त्याची पाहणी करावी. | अध्यक्ष यांनी शेताचा सर्व्हे क्रमांक सांगण्याची सूचना केली. |

5)**श्री आशीश मेहेर, राहणार-नवेगाव जिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | 2013 मध्ये खूप आक्षेप होते. श्री रेड्डी यांनी त्यावर आपण काय काम केले ते सांगावे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (ईआयए) प्रथम मराठीत उपलब्ध करुन देण्यात यावा. लोकांना, येथील भोळा भाबडा शेतक-याना प्रथम पहिले प्रकल्प समजून घेऊन द्या, नंतर ही जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| 2) | ईआयए तयार करताना तो एकाच माणसाने तयार केलेला आहे. तोच माणूस ध्वनी प्रदूषण, तोच माणूस जल प्रदूषण, तोच इतर नोदी घेतो, तर त्या तज्ञ व्यक्तीस आणावे. आमचा हा दहा वर्षाचा आक्रोश आहे. | अध्यक्ष यांनी सांगितले की या मुद्‌याची नोंद घेण्यात येत आहे. |
| 3) | कंपनीने दिलेल्या झाडांची संख्या चुकीची आहे, एवढी संख्येची झाडे कंपनीत नाहीत. तसेच कंपनीच्या अहवालात डस्टमुळे माणसाच्या श्वसनावर आणि हृदयावर परिणाम होतो हे लिहून दिलेले आहे. तरीही कंपनीने त्यांच्या कामगारांची आरोग्य तपासणी केलेली नाही. तरी प्रकल्प बाधीत गावातील म्हणजे तारसा, आष्टी व नवेगांव या गावातील प्रत्येक कुटुंबातील दोन व्यक्तीचा विमा कंपनीने काढून द्यावा. | प्रकल्प धारकाने सूचनेची नोंद घ्यावी, असे अध्यक्षांनी सुचविले. |
| 4) | प्रकल्प बाधित गावातील कुशल, अर्धकुशल, अकुशल व्यक्तींना रोजगाराची संधि प्रकल्पात देणे. बाधित तीन गावात दवंडी देण्याची सूचना केलेली होती. ती पाळली नाही. तसेच प्रकल्प बाधित गावात आर.ओ. प्लॅन्ट उपलब्ध केलेला नाही. | प्रकल्प धारकाने सूचनेची नोंद घ्यावी, असे अध्यक्षांनी सुचविले. |
| 5) | कंपनीचे विद्युत पुरवठा करणारे उपकेंद्र येथे आहे. तर कंपनीनेआष्टी,नवेगाव यांना स्वतंत्र फिडर देऊन वीजेची सोय करण्यात यावी, प्रकल्प बाधित गावात मुलभूत सुविधा पुरविल्या नाहीत, मागच्या वेळची जाहीर जनसुनावणीचा आश्वासने पूर्ण झालेली नाहीत. तरी इतिवृताची प्रत स्टँप पेपरवर प्रकल्पबाधित ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात यावी. | अध्यक्ष यांनी सांगितले की उद्यापर्यंत लेखीस्वरुपात निवेदने देण्यात यावीत. त्याचप्रमाणे चांगला मुद्दा उपस्थित करण्यात आला की कंपनी व ग्रामपंचायत याच्यात समन्वय आवश्यक आहे. उत्तरादाखल प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की बाधित गावांना त्यांच्या गरज कंपनीस कळवाव्यात, त्यानुसार आम्ही स्थानिक ग्रामपंचायतांच्या सरपंचा सोबत चर्चा करुन अंमलबजावणी करु. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की सीएसआर अंतर्गत जे अंदाजपत्रक मंजूर आहे, त्यात मी दहा लाख वाढवू शकतो आम्ही गावात पिण्याचा पाण्यासाठी वीजेचे पंप दिलेले आहेत. मात्र संपूर्ण गावासाठी फिडर लावून द्या हे शक्य नाही. मात्र याबाबत महावितरण कंपनीशी चर्चा जरुर करण्यात येईल. तर्शी परवानगी मिळण्यास वेळ लागेल. तीन्ही गावांनी |

| | | |
|---|---|---|
| | | लेखी स्वरुपात आपल्या गरजा कळवाव्यात, त्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल. या तीन्ही बाधित गावातील ज्यांची जमिन प्रकल्पात गेली, त्यांच्या मागणीस सर्वात जास्त प्राधान्य देण्यात येईल. अध्यक्ष यांनी हे विषय चर्चा करुन मार्गी लावण्याची सूचना केली. त्याचप्रमाणे शासकीय मुद्दे हे तहसीलदार, उप विभागीय अधिकारी यांच्याकडे उपस्थित करण्यात यावेत, असे सुचविले. |
| ६) | कंपनीस सीएसआर निधीबाबत माहिती मागितली, तर त्यांनी दिली नाही. तीन्ही गावात मुलभूत सुविधा नाही. वर्षाचे दोन लक्ष टन उत्पादन आहे. ते त्यापेक्षा जास्त काढत आहेत. प्रकल्प विस्तारिकरण केल्यानंतर हे जास्त उत्पादन काढणार, त्याचा त्रास प्रकल्प बाधित गावांना होणार. सीएसअआर निधी कुठे खर्च केला व भविष्यात किती खर्च करण्यात येईल याबाबत लेखी माहिती उपलब्ध करण्यात यावी. 2015-16 ची सीएसआर निधीबाबतची प्रकल्प प्रवर्तकांची यादी वाचून दाखवत आहे- सांस्कृतिक कार्यक्रम – गणेश उत्सव, दुर्गा उत्सव, शारदा उत्सव – १ लाख रुपये. – एकूण ३ लाख. त्या मंडळाची पावती दाखवावी. कारण ते आमचेच मंडळे आहेत.<br>येथे मा. आमदार यांनी आक्षेप नोदविला की दहा हजारापेक्षा जास्त रक्क्म रोख देता येत नाही, तर कसे दिले? | प्रकल्प धारकांनी सदर बाबीमध्ये असे सांगितले की, धुळीचे प्रदूषण रोखण्याकरीता प्रकल्पामध्ये प्रत्येक धुळ निर्माण होणाऱ्या ठिकाणी बॅग फिल्टर ची व्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच प्रस्तावीत विस्तारीकरणामध्ये सुध्दा बॅग फिल्टरची व्यवस्था करण्यात येईल. सीएसआर निधी खर्चाबाबत स्थानिक ग्रामपंचायत यांनी करावयाच्या कामाची यादी दिल्यास सदर कामे ही सीएसआर निधीतुन स्थानिक गावांच्या सुविधेसाठी करण्यात येईल, असे आश्वासन दिले. |
| 7) | 2015 शारदा उत्सव – पाच लाख- श्री रेड्डी याची सही असलेला अहवाल आहे. तर हे पैसे कुणाला देण्यात आले. शाळेला एक खुर्ची दिलेली नाही.शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी काय केले. जनसुनावणीची तीस दिवस अगोदर जाहिर सूचना प्रकाशित झाल्यानंतर हे पत्र दिलेले आहे, असे नाही की आता विचारले व दिले. शिवाय हे पत्र श्री रेड्डी याच्या सहीचे आहे. | प्रकल्प धारकाने सदर बाबीमध्ये माहिती घेवून कार्यवाही करण्याबाबत आश्वासन दिले. |

| | | |
|---|---|---|
| 8) | आमचा वैयक्तिक विरोध श्री रेड्डीशी नाही. मात्र ते सहा वर्षांनी आले. तसेच एका व्यक्तीचे दोन्ही ठिकाणी नाव आहे, तो पानठेला चालवितो व कंपनीत काम करतो. | प्रकल्प धारकांनी दरवर्षी येवुन स्थानि नागरिकांच्या अडचणी समजुन घेवून त सोडविण्याचा प्रयत्न राहील, असे आश्वास दिले. |
| 9) | गावकऱ्यांवर दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे कंपनीने मागे घ्यावेत, तसेच सीएसआर निधीत काम पूर्ण झाल्याचे ग्रामपंचायत सर्टिफिकेट हवे. मा. आमदार यानी सांगितले उद्या पाचही गावच्या सरपंचाना बोलवा व सर्व हिशोब देण्यात यावा. | प्रकल्प धारकांनी सदर बाबीमध्ये कंप व्यवस्थापना समवेत चर्चा करून पुढील बा कळविण्यात येईल, असे आश्वासन दिले. |

6) **श्री महेन्द्र तांडेकर, सरपंच, गट ग्रामपंचायत,आष्टी-नवेगाव,जिल्हा – नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावण समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल बनविला, तो कंपनीने नियुक्त माणसाने बनविला, त्याने तसा बनविला व तुमच्या घरी आणून दिला. सर्वेक्षण करताना कुठे केले, कुठे मशिन लावली हे गावातील लोकांनाच माहित नाही. अहवालात सर्वेक्षणाचा एक दिवस एक माणूस रस्त्यावर वाहनांचे सर्वेक्षण करण्यासाठी बसला असे सांगितले आहे. तर केव्हा व कोठे बसला याची माहिती स्थानिकांना उपलब्ध करावी. | सदर बाबीची नोंद घेण्यात आलेली आहे. |
| 2) | कंपनीचे व लॉजिस्टीकचा काय संबंध आहे. काही दिवसांपूर्वी लॉजिस्टीकच्या वाहन चालकानी एकाला धक्का दिला. कंपनीचा माणूस सांगतो की कंपनीचा व लॉजिस्टीकचा संबंध नाही. | प्रकल्प धारकांनी सांगितले की, प्रकल्पात एक लॉजिस्टील विभाग असतो. कंपनीने कंत्राट दिले असल्याने लॉजिस्टीकचा प्रत्यक्ष संबंध नाही त्याचे ट्रक वाहनचालक कंपनीच्या कामगार नाहीत. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की कंत्राट नुतनीकरण करताना वाहनचालकांनी चुक केल्यास त्यावर दंड लावण्यात येईल. प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, अशा प्रकारचा गैरप्रकार झाल्यास आम्ही त्या वाहनचालकांवर कारवाई करतो,कंत्राट नुतनीकरणात अटी व शर्ती लागू करण्यात येतील व त्यांचे पालन करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | याबाबत पोलिस प्रशासनाशी समन्वय ठेवण्यात येईल. |
| 3) | सीएसआर वार्षिक निधी टक्केवारी झालेल्या व येणा-या वर्षाची जाहिर करावी. | प्रकल्प प्रवर्तक यांचे उत्तर - आमच्या कंपनीत एका युनिटचा जमा व खर्च काढला जात नाही. त्यामुळे टक्केवारी सांगता येणार नाही. सीएसआर निधी खर्चासाठी वेगळा विभाग आहे.<br>येथे वीस लाख व अतिरिक्त दहा लाख मी खर्च करु शकतो. मात्र सर्व ग्रामपंचायतीतील सरपंचाचे पत्र आल्यास काम प्राधान्याने करण्यात येईल.<br>मी येथे वचन देतो की सहा महिन्याने येऊन मी स्वतः या बाबीवर चर्चा करून योग्य मार्ग काढण्याचा प्रयत्न राहील. |
| 4) | मा.आशीष जैस्वाल आमदार यांनी मागणी केली की कंपनीने जे सीएसआर उपक्रम राबविले, ते जनतेसाठी डिस्प्ले करण्यात यावेत. प्रत्येक गावासाठी किती सीएसआर निधी खर्च केला याची यादी जाहिर करण्यात यावी, आपण प्रत्येक गावात दरवर्षाचे काम व खर्च केलेला निधी प्रकाशित करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी त्यास सहमती दर्शवित ती यादी जाहिर करण्याचे आश्वासन दिले. |
| 5) | मा.आमदार जैस्वाल यानी सांगितले की लोकांची कंपनी प्रशासनाविरूध्द नाराजी असल्यामुळे कंपनीस विरोध करत आहेत. कंपनीविषयी लोकांना सकारात्मक बोलले पाहिजे. कंपीनीने 4-6 महिन्यात गावातील लोकप्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक यांना बोलावून स्थानीक अडचणीबाबत चर्चा करणे अपेक्षित होते. तरी बाधित व परिसरातील गावात समन्वय त्वरित ठेवण्यात यावा. | प्रकल्प प्रशासनामार्फत सूचनेची नोंद घेण्यात आली. |

एका युवकाने कंपनी कसे प्रदूषण करते व परिसरातील शेतांचे कसे नुकसान झाले याचा व्हिडिओ दाखविण्याची मागणी व प्रयत्न केला. ब-याच उपस्थितांना त्यास पाठिंबा दिला. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सदरहू व्हिडिओ जमा करण्यास सांगितले व तो शासनास पाठविण्यात येईल अशी माहिती दिली.

अध्यक्ष यांनी मत मांडले की आपण आपल्या गावात तो दाखवू शकता, मात्र येथे आता तो दाखवता येणार नाही. जनसुनावणीत उपस्थितांच्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येते, कुठलाही निर्णय घेता येत नाही.

येथे स्थानिक आमदार यांनी सांगितले की एवढे लोक कंपनीच्या विरुध्द बोलतात, तर कंपनीस बंद करण्यास काहीही वेळ लागणार नाही. आता जर केसेस केल्या, जेलभरो आंदोलन, तर आम्ही आमचे बघू.

7) **श्री स्वप्नील मेहेर, जिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | आम्ही स्थानीक लोक अल्ट्राटेक मध्ये काम करतो, आम्हांला माहित आहे की प्रकल्पात काय चालते, किती चिटींग करतात. | प्रकल्प धारकांनी असे सांगितले की, विद्यमान उद्योगामध्ये शासनाच्या नियमाच्या चौकटीत राहुनच काम करण्यात येते, तरी आपण सादर केलेल्या मुद्दयाची कंपनी प्रशासनामार्फ नोंद घेण्यात आली. |

८) **श्री राहूल मोहारे, राहणार-आष्टी, जिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | या कंपनीत कुठलीच सवलत दिली जात नाही. आम्ही त्यासाठी आक्षेप नोंदविला असता आमच्यावर चोरीचा आळ आणून घरी बसविले | प्रकल्प धारकांनी असे सांगितले की, कामगार विभागाच्या मार्गदर्शक सुचनांचे पालन कंपनी प्रशासनामार्फत करण्यात येते. |

९) **सौ. वैशाली आनंद लेंडे,सरपंच, तारसा, जिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | महिला सरपंच — कंपनीने महिलासाठी काय केले, आम्हांला रात्री जाण्यास भिती वाटते, महिला सरपंच यांना समस्या सोडविण्यासाठी रात्री जावे लागते. तुमचे वाहनचालक हे | प्रकल्प धारकांनी असे सांगितले की, सदर बाबीमध्ये योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. त्याचप्रमाणे ट्रक ठेकेदाराला ठेका देतांना सदर बाबीच्या अटी व शर्तीसहीत देण्यात येईल, असे |

| | | |
|---|---|---|
| | मद्यपान करतात व रस्त्याच्या कडेला ट्रक लावून जातात, कंपनी त्याबाबत काहीही लक्ष घालत नाही, जर कंपनीकडे तक्रार करण्यास गेले, तर सरपंचाला सुध्दा ते कंपनीत घे नाही. | आश्वासन दिले. तसेच पोलिस विभागास सदर बाबीची माहिती देवून संबंधित ट्रक चालकावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास कंपनी प्रशासन पुढाकार घेईल. |
| 2) | कंपनी क्षमतेपेक्षा जास्त वाहतुक करते, त्यामुळे रस्त्यावर मोठाले खड्डे पडले असून त्यामुळे स्थानिकांचे अपघाताने कोणाचे हात, पाय तुटलेले आहेत, कंपनी त्याबाबत लक्ष देत नाही. त्याची तक्रार केल्यास ते सरपंच्याविरुध्द केस लावतात. माझे पती माजी सरपंच असून त्यांचा या कंपनीच्या खड्डयांमुळे अपघात झाला, मी सक्षम असल्याने कुटुंबाची काळजी घेऊ शकले, मात्र इतर महिलांचे काय होईल? | प्रकल्प धारकांनी असे सांगितले की, सदर बाबीची नोंद घेण्यात आली असुन सदर बाबीमध्ये कंपनी प्रशासनामार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. |
| 3) | आमच्या गावात कंपनी चालू करण्यासाठी आम्हाला ना हरकत प्रमाणपत्र मागता, मात्र सरपंच व इतर लोकांवर खोट्या केसेस करता. तर आम्ही का ना हरकत प्रमाणपत्र द्यावे? आमच्या स्थानिक लोकांना नोक-या देत नाहीत, दिल्या तर वेतनसुध्दा कमी देतात. | प्रकल्प धारकांनी असे सांगितले की, कामगाराचे वेतन हे कामगार विभागाच्या नियमानुसारच देण्यात येते. तसेच जास्तीत जास्त स्थानिकांना रोजगारात प्रथम प्राधान्य देण्याचा कंपनी प्रशासनाचा मानस असतो. विस्तारीकरण प्रकल्पामध्ये स्थानिकांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगार उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन दिले. |

10) **श्री रमेश कारेमोरे, प्रहार जिल्हाप्रमुख, नागपूर विभाग-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| 1) | जर ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे, तर पर्यावरणाचा व्हिडिओ का पाहत नाही? | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की या समितीस कुठलाही निर्णय घेण्याचा अधिकारी नाही. |
| 2) | माझा मुद्दा आहे पर्यावरणासोबत रोजगाराची आशा होती. कंपनीकडून अपेक्षाभंग करण्यात येते. कामगारांना वागणूक चुकीची मिळते, कमान वेतनाची पायमल्ली, कुशल, अर्धकुशल यात वेतनाची वर्गवारी नाही. | सूचनांची नोंद घेण्यात आली.<br><br>प्रकल्प प्रवर्तकांनी स्पष्ट केले की, शासकीय नियमानुसार दरदिवस वेतन – रुपये 358, 362, 376. आहे |

| | | |
|---|---|---|
| | कामगाराने आवाज उठविल्यास कंपनीकडून खोट्या केसेस, धमकावणे, कंपनीच्या पॅकेजिंग विभागात मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होते. त्यामुळे कामगारांचे आयुष्यमान कमी होत आहे. | शासनाचे चे किमान वेतन आहे, त्यापेक्षा जास्त वेतन कंपनीत अदा होते – अकुशल संवर्गात – 84 रुपये जास्त, 131 रुपये जास्त अर्धकुशल त कुशल मध्ये 170 जास्त तर उच्च कुशल संवर्गा 216 जास्त देतो.<br><br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावण समिती – आपली रस्त्याबाबतची व इतर मागण्य – कामगार कायद्याचे उल्लंघन, आरोग्य शिबि आयोजन या बाबी लेखीस्वरुपात शासनास साद करण्यात याव्यात. |
| 3) | कंपनीच्या प्रदूषणामुळे 10 कि.मी. पेक्षा जास्त असलेल्या शेतपिकांवर परिणाम. | यावर अध्यक्षांनी सांगितले की, सदर बाब ह तहसिलदारांमार्फत शासनास सादर करावी. |
| 4) | मौदा ते रामटेक गावात आरोग्य तपासणी करावी 70% ते 80% लोक श्वसनाच्या त्रासाने आजारी, डोळ्याच्या त्रासाने आजारी, बरेच लोक गभीर आजाराने ग्रस्त – सिमेंट उत्पादनामुळे सीएसआर निधी स्थानिकांसाठी खर्च होत नाही. विस्तारीकरण प्रकल्पास विरोध दर्शविला. | प्रकल्प धारकाने सांगितले की, कंपन प्रशासनामार्फत तीन्ही गावांमध्ये दर सह महिन्यात आरोग्य शिबीर राबविण्यात येईल तसेच तीन्ही ग्रामपंचायतीच्या संरपचा समवे बैठक घेवूनी सीएसआर निधी खर्चाबाब ठरविण्यात येईल, असे आश्वासन दिले. |

11) **सौ. प्रियंका भास्कर मेहेर, राहणार-नवेगावं, जिल्हा-नागपूरः**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावण समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| 1) | हा व्हिडिओ आम्हांला स्थानिकांना पाहायचा आहे. तरी तो सर्वांना पाहून द्यावा. आमचे स्थानिक लोक प्रकल्पात नोकरी करतात, धूळ आपल्या अंगावर घेतात. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| 2) | कंपनीने महिलांना प्रशिक्षण देताना शिलाई मशिन्स देण्याचे आश्वासन दिले, मात्र एवढे दिवस जाऊनही आम्हांला अजूनही शिलाई मशीन दिलेले नाही. प्रकल्प व्यवस्थापनाने महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविलेली नाही. तरी महिलांनाही प्रकल्पात | प्रकल्प धारकाने सांगितले की, स्थानिक महिलांन योग्य प्रशिक्षण देवून रोजगाराची संधी उपलब्ध होईल. तसेच कंपनीमार्फत शिलाई मशिन उपलब्ध करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | रोजगाराची संधि व महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविण्यात यावी. | |
| 3) | प्रकल्प प्रवर्तकांनी अभिवचन दिले होते की प्रशिक्षण पूर्ण केल्यांनतर उद्योगधंदा देऊ आणि मशिन मिळेल. या प्रमाणपत्रासोबत आम्ही चारवेळा फ़ॉर्म भरला. तरीही आम्हांला मशीन मिळालेले नाही. तर आमहांला अल्ट्रा टेक कडून मशिन हवी आहे. येथील मजुंराना खूपच कमी मजुरी मिळते. | प्रकल्प धारकाने सांगितले की, आपल्या अडचणी आम्हांला समजल्या असून मी बजेटबाबत विचारणा केली. दरवर्षी 3-4 लोकांना मशिन उपलब्ध करुन देण्यात येईल. आम्ही त्यासाठी निश्चितच पर्यत्न करु. बजेट नसले तरी मशिन देण्यात येईल. |

12) **श्री निळकंठ मेहेर, राहणार--- आष्टी, जिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| 1) | कारखान्याच्या उत्तरेला आष्टीकडे माझा भूखंड आहे. रस्त्याचा बाजूस शेती, माझ्या अडचणीसाठी 06 ऑक्टोबरला मेलसुध्दा केलेला आहे. माझी भाऊ यादवराव मेहेर, कारखान्याच्या दक्षिणेला लागून शेती. या आम्ही दोघे भाऊ हे प्रकल्पबाधित आहोत. प्रकल्प प्रवर्तक श्री रेड्डी यांच म्हणणे वृक्षारोपण केलेले आहे, मी सर्वेक्षण केले, तर बाभळीचे झाडे दिसतात. बाभळीचे झाडे हे कंपनीने लावलेले नसून ते आपोआप येते-येथील ते मुख्य झाड आहे. सर्वात प्रदूषण करणारे कारखाने म्हणजे सिमेंट व हायड्रो इलेक्ट्रीक, कोळशापासून वीजनिर्मिती प्रकल्प. तरी झाडे लावले ही चुकीचे आहे. शासनाने सर्वेक्षण करावे. या प्रकल्पामुळे परिसरातील सर्व गावे हे या कंपनीच्या प्रदूषणामुळे बाधित आहेत. | पुढील आक्षेप वृक्षारोपण केलेले नाही. वृक्षारोपण तपासण्यासाठी जी समिती लक्ष ठेवते, ती ड्रोनव्दारे पाहणी करत असते. आमच्याकडे जागा आहे, त्यामुळे जेवढी झाडे लावली त्यापेक्षा जास्त लावण्यात येतील. मी येथे कुठलीही गोष्ट चुकीची सांगितलेली नाही. ड्रोन सर्वेक्षण माझ्याजवळ आहे (प्रकल्प प्रवर्तक) |
| 2) | रात्रभर कंपनीचे मोठे दिवे जळत असतात. त्यामुळे बाहेरचे प्राणी आमच्या शेतातील पीके येऊन खात आहेत. कारखान्यातील डस्ट ही गाडीवर पडली, की ती निघत नाही, शेतावर धूळ/डस्ट पडल्यानंतर काय स्थिती होत असेल. पीकांचे फोटो काढलेले आहेत, जर | प्रकल्प प्रवर्तक यांनी मत मांडले की श्री मेहेर यांना धन्यवाद, विविध पर्यावरणाचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. मी प्रकल्पातून प्रदूषण होत नाही असे कधिही म्हटले नाही. प्रकल्पातून जरी प्रदूषण होत असले,तर ती मापदंडाच्या आतच (within prescribed limits) असते. चिमणीतून राख |

| | | |
|---|---|---|
| | न्याय मिळाला नाही, तर कोर्टात जाणारच आहोत. मी शेतक-याचा मुलगा आहे. प्रकल्प प्रवर्तक जे म्हणतात प्रदूषण होत नाही ते चुकीचे आहे. | उडते, मात्र ती 30 मिलीग्रॅम मापदंडापेक्षा कमी असते, फ्युजिटीव्ह इमिशन्समध्ये राख उडते. कधितरी न्युमॅटिक उपकरणे खराब झाली, तर राख उडते. कोणी व्हिडिओ प्रदूषणाचा आणला असेल, तर तो चुकीचा नाही. जेथे 2.0 लाख टन मटेरिअल्सची हाताळणी होते, तर तेथे राख उडते. मात्र ती आम्ही मापदंडाच्या आतच (within prescribed limits) असते. |
| 3) | राखेचे प्रदूषण हे या प्रकल्पापासून होतेच. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आम्ही प्रदूषण थांबवू. तर संध्याकाळी घराच्या स्लॅबवर धुळीचा थर असतो. गव्हाच्या उंबया भरत नाहित. प्रकल्प प्रवर्तक असे म्हणतात की डस्ट/राख ही फायद्याची आहेत. हे आपण पहिल्यादाच ऐकत आहोत, ती धूळ मातीतील पोषक द्रव्ये शोषून घेते. शेतातील मातीचा नमुना आणलेला आहे, त्यात सिमेंटचे प्रमाण किती हे तपासावे.जर 2,000.0 मे.टन उत्पादन करत असताना ही स्थिती आहे,तर विस्तारिकरण 5.4 मे.टन पर्यंत करणार, म्हणजे आम्हांला मारणार का? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की संपूर्ण भारतातील सिमेंट उद्योगात 60.0 मिलियन फ्लाय एशचा वापर होतो. टँकर न्युमॅटिकली प्रकल्पात रिकामा केला जातो. लगेच फ्लाय एश ही सायलोला जाते.<br>चिमणीतून राख उडते, त्याचे फोटो माझ्याजवळ आहे. बॅग फिल्टरमध्ये बिघाड झाल्यास लगेच शासनास मेसेंज दिला जातो.<br>आम्ही आयआयटी,मुंबई कडून सर्वेक्षण व अभ्यास केलेला आहे. तर 30 ते 60 मिलीग्रॅम राख उडते, ती प्रत्येक प्रकल्पातील तंत्रज्ञानानुसार असते. आमचा प्रकल्प 1974 असेल, तर तेथे तंत्रज्ञान पूर्वीचे असेल, तर तेथे राख उडण्याचे प्रमाण 50 मिलीग्रॅम असू शकते. मात्र प्रकल्पात प्रदूषण होत नाही असे आम्ही म्हणत नाही, जेवढे शक्य आहे, तेवढे आधुनिक तंत्रज्ञान प्रकल्पात कार्यान्वित करण्यात येते. जर सिमेंट प्रकल्पात बॅग हाऊसपेक्षा दुसरे तंत्रज्ञान आहे, तर आम्हांला सांगा, आम्ही ते निश्चितच प्रकल्पात अंमलात आणू.<br>प्रकल्पात येणारे फ्लाय एश हे टँकरव्दारे आणले जाते. आता केंद्र सरकारचे धोरण आहे की फ्लाय एशचा जास्तीतजास्त वापर करण्यात यावा. भारतात अंदाजे 200.0 मिलियनपेक्षा जास्त फ्लाय एशची निर्मिती होते. |
| 4) | आमच्या माहितीनुसार कंपनी परवानगी न घेता आतमध्ये 4,000.0 मे.टन सिमेंटचे उत्पादन करते. जर 5,000.0 मे.टन | प्रकल्प धारकाने सांगितले की, उत्पादन हे शासनाने आखुन दिलेल्या मर्यादेपर्यंतच केली जाते. तशी माहिती आम्हांला शासनास सादर करणे बंधनकारक असते. |

| | | |
|---|---|---|
| | परवानगी दिल्यास ते 10,000.0 मे.टन उत्पादन करतील. | |
| 5) | कारखान्याच्या गेटवर काही निवेदन देण्यास गेल्यास ते घेत नाहि, हाकलून लावतात. पोस्टमनकडूनही पत्र घेत नाही.<br>ग्रामसभेचा ठराव 28-03-2023 चा आहे. तो महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास दिलेला आहे. त्यावर काहीही कारवाई झालेली नाही. तरी त्याबाबत मी निळकंठ पांडुरंग मेहेर आक्षेप घेत आहे.<br>13-2-2023 ला शेतावर येऊन कृषि अधिका-यातर्फे पंचनामा करण्यात आलेला होता. तो महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास पाठविण्यात आलेला आहे. कारखान्यास पाठविले असताना त्यांनी नकार दिल्याने परत आले.<br>यावेळी आमदार जैयस्वाल यांनी सांगितले की डोळ्यांनीसुध्दा नुकसान झालेले दिसते, तर कुठल्याही तज्ज्ञ संस्थेची जरुरी नाही. त्यांचे कारण योग्य असून त्यांना कंपनीकडून नुकसान भरपाई देण्यात यावी. तहसील कार्यालयाचा अहवाल आहे की येथे नुकसान झालेले आहे. 2022 चा अहवाल आहे. तर त्यास नुकसान भरपाई का देण्यात आलेली नाही? उपस्थितांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्प प्रवर्तक जाणूनबूजून नुकसान भरपाई अदा करताना टाळाटाळ, विलंब करतात.<br><br>आमदार जैस्वाल यांनी सागितले तहसीलदाराचा अहवाल मिळाल्यावर आपले एका वाक्यात उत्तर हवे आमच्यामुळे प्रदूषण झाले, आम्ही नुकसान भरपाई देऊ. वास्तविक कंपनी प्रशासनास तहसीलदारच्या अहवालाची गरज नाही, त्यांनी स्वतःहून पाहणी करुन नुकसानभरपाई त्वरित देणे आवश्यक आहे. बैठकीत एवढे लोक आपल्या | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आपण आक्षेप नोंदविला की शेतीपीकावर या प्रकल्पाचा विपरित परिणाम होत आहे. तर त्यासाठी तज्ज्ञ संस्थेकडून पाहणी, सर्वेक्षण करण्यात येईल. श्री मेहेर यांनी सांगितले की प्रकल्पाच्या दक्षिणेस व उत्तरेस आम्हां दोन्ही भावांचे शेत आहे. आयोजक यांनी सांगितले की त्यांचा आक्षेप आहे की त्यांच्या शेताचे नुकसान होत आहे, त्यासाठी आपण काय करणार आहात. त्यांचा कृषि अधिका-यांचा अहवाल आहे, तो शासनाचा अहवाल आहे. त्याप्रमाणे नुकसान भरपाई दिली जाईल.<br>अध्यक्ष यांनी सदर बाबीमध्ये त्वरित दखल घेण्याची सूचना केली. |

| | | |
|---|---|---|
| | विरुध्द बोलत आहेत, कारण आपण त्वरित नुकसानभरपाई देणे आवश्यक होते. | |
| 6) | जनसुनावणीत आमची सामान्य माणसांची बाजू ऐकली पाहिजे. आमचे हे नुकसान होते, त्याबाबत आमची हरकत आहे. नुकसानीचा मोबदला देण्यात यावा, प्रकल्प बाधितांच्या मुलांना नोक-या देण्यात याव्यात. जर नोकरी देणे शक्य नसेल, तर वेगळ्या प्रकारे मोबदला देण्यात यावा. अन्यथा कारखाना हा बंद करण्यात यावा. आमचा अनुभव आहे की परिसरातील पीक येणे हे निश्तिच घटलेले आहे. | अध्यक्ष यांनी सांगितले की मा. आमदारमहोदय व शेतकरी यांचे म्हणणे बरोबर आहे. ज्यांचे नुकसान झाले, त्यांनी त्वरित नुकसानभरपाई अदा करणे आवश्ययक आहे.<br><br>प्रकल्प धारकांनी सात दिवसात नुकसानभरपाई त्वरित अदा करण्याचे आश्वासन दिले. |

13) **श्री बाळकृष्ण खंडाईत, राहणार-तारसा, जिल्हा-नागपूरः**

| अनु. क्रं. | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| 1) | सरपंच यांनी जे सांगितले ते खरे आहे. कंपनीच्या गाड्यांमुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. 200-250 गाड्या जातात. मी 24 तास हजर आहे. रस्त्यावरुन जायला भिती वाटते. जेव्हापासून मौदा ग्रामपंचायत सुरु झाली, तेव्हापासून बोर्डावर नांव आहे.<br>तरी माझी विनंती आहे की प्रकल्प विस्तारिकरण करा, मात्र येथे स्थानिक नागरीकांनी उपस्थित केलेले आक्षेप, सूचना याबाबत त्वरित कार्यवाही करण्यात यावी. | सूचनांची नोंद घेण्यात आली असुन, कंपनी प्रशासनामार्फत त्वरील कार्यवाही करण्यात येईल. |

14) **श्री शालिनी देशमुख, सदस्य, जिल्हा परिषद-नागपूरः-**

| अनु. क्रं. | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| 1) | रेल्वेस्टेशनजवळ दहा एकर शेती आहे. मिरचीचे पीक घेतलेले आहे आणि त्यावर धूळ | सूचनेची नोंद घेण्यात आली असुन सदर बाबीमध्ये सरपंचासोबत बैठक घेवून मुद्दा निकाली |

| | | |
|---|---|---|
| | बसलेली आहे. एवढे प्रदूषण होते, तर प्रकल्प प्रवर्तक म्हणतात प्रदूषण होत नाही. तसेच परिसरातील शेतक-यांना कंपनीतील राखेचा, प्रदूषणाचा त्रास होत आहे. शेतक-यांचे शेती उत्पन्न हे प्रदूषणामुळे कमी झालेले आहे.<br>कंपनीतील जड वाहन क्षमतेपेक्षा जास्त मालाची ने-आण करतात, त्यामुळे रस्त्यांना मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे. माझ्या दीराचा अपघात हा रस्त्यावरिल खड्यामुळेच झाला. अपघाताची भरपाई कंपनीकडून केली जात नाही. तरी याबाबत त्वरित तोडगा काढण्यात यावा.<br>माझा आणि माझ्या गावक-यांचा या विस्तारिकरण प्रकल्पास विरोध आहे. तरी गावक-याच्या हितासाठी तोडगा काढण्यात यावा. दहा वर्षापूर्वी ही प्रकल्प झाला, प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे सर्व लोक त्रस्त आहेत आणि विस्तारिकरणामुळे प्रदूषणात वाढ होईल. तरी स्थानिक लोकांच्या हितासाठी तोडगा काढण्यात यावा. | काढण्यात येईल, असे प्रकल्प धारकांनी आश्वासन दिले. |

15) **मीरा ढाले, राहणार-आष्टी,जिल्हा-नागपूरः-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| 1) | कंपनी सुरु होण्याअगोदर मी शेतकरी होती, आताही शेतकरी आहे. तेव्हाची शेती व आताची शेती यात जमिनआस्मानचा फरक पडलेला आहे. तीन एकरात 70-72 पोती धान होत असे. आता 50-55 पोते धान होत आहे. आता जर कमी उत्पन्न मिळते, तर त्याची भरपाई कोण करणार?<br>श्री रेड्डी म्हणतात डस्टमुळे काहीही होत नाही. गावात मिरचीचे उत्पादन होत होते. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले आरोग्य शिबिर सहा महिन्यात आयोजित करण्यात येईल. त्यासाठी लागणारे नियोजन म्हणजे वैद्कीय संस्थेशि चर्चा, आरोग्यशिबिराची जागा याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. तीन्ही गावातील सरपंचांना त्याबाबत सूचना देण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | आता ते 50% पेक्षा खाली उत्पादन होते. मिरची झाडे मोठी होतात, मिरची वाळून जाते. त्याची भरपाई.<br>शेती उत्पादन कमी झाल्याने महिलांचा रोजगार कमी झाला. त्याची भरपाई. कंपनी महिलांना रोजगार, काम देत नाही. प्रशिक्षण महिलांना दिले, पण शिलाई मशिन दिली नाही. महिलांना बारा महिने काम मिळेल असा उपक्रम कंपनी हातात घेत नाही.<br>कंपनी सुरु होताना आम्ही विरोध केला. आमचे आनंदाचे दिवस कंपनीमुळे दुःखाचे झालेले आहेत. कंपनीच्या प्रदूषणामुळे शेती उत्पादनात घट झाली, उरलेल्या शेतजमिनीत शेतीउत्पादना घट झालेली आहे. स्थानिक लोकांऐवजी बाहेरुन लोक आणले जातात.<br>कंपनीच्या प्रदूषणामुळे स्थानिक लोकांना श्वसनाचे त्रास सुरु झालेले आहेत. त्याबाबत कंपनी जबाबदारी घेत नाही. आरोग्यशिबिर घेत नाही.<br>जे विरोध करतात, त्यांचे खिस गरम करुन त्यांचा आवाज बंद करतात. विरोध करणा-यावर खोटे केसेस करतात. | |
| 2) | कंपनीतील वाहनाचे वाहनचालक बसलेले असतात. शाळेतील मुली येत असताना ते तेथे बसलेले असतात. संध्याकाळी सात वाजता मुली घरी येईपर्यंत पालकांचा जीव टांगणीवर असतो. रस्त्यावर लाईटची सोय नाही. | प्रकल्प धारकांनी सांगितले की, रस्त्यावर पथदिवे लावण्यात येईल, तसेच दोषी वाहन चालकाविरूध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करून त्यामध्ये पोलिस विभागाकडे तक्रार करण्यात येईल.<br>प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले येथील स्थानिक युवकाने तेथे पानठेला लावलेला आहे. त्यास बंद करण्याच्या सूचना देण्यात येईल. |

17) **श्री आनंदजी लेंढे, माजी सरपंच, तारसा ग्रामपंचायतः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | माझी धर्मपत्नी सरपंच आहे. तारसा गाव मौदा तालुक्यातील मोठे गाव आहे. कंपनीत कच्चा माल येताना जड वाहन क्षमतेपेक्षा जास्त माल भरतात. माल बाहेर नेल्यावर वाहनचालक चौकातच गाड्या उभ्या करतात. वाहतुक खोळंबा होतो, बरेच अपघात झालेले आहेत. | अध्यक्ष यांनी वाहतुक पोलिसाना याबाबत पुढील कार्यवाही त्वरित करण्याच्या सूचना दिल्या. |
| 2) | प्रदूषण नियंत्रण मंडळात 2021 मध्ये तक्रार केलेली होती. त्याची दखल घेऊन कृषि अधिका-यास सर्वेक्षण करण्यास सांगितले. अहवाल सादर केला, अहवालात 8-9 शेतक-यांना मोबदला देण्याची सूचना करण्यात आली. | याबाबत कंपनीने पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिलेले आहे. |
| 3) | प्रकल्पबाधीत गावातील जमिनी गेल्या, आरोग्य हे धोक्यात आहे. तरी कंपनीने अजूनही आरोग्यशिबिर आयोजित केलेले नाही. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले आरोग्यशिबिर सहा महिन्यात आयोजित करण्यात येईल. त्यासाठी लागणारे नियोजन म्हणजे वैदकीय संस्थेची चर्चा, आरोग्यशिबिराची जागा याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. तीन्ही गावातील सरपंचांना त्याबाबत सूचना देण्यात येतील. |
| 4) | प्रकल्पातील कामगारांना धमक्या देऊन त्यांच्याकडुन काम करुन घेण्यात येते, शासानाचे सर्व किमान वेतनाचे नियम पायदळी तुडविले जातात. तसेच सीएसआर निधीसाठी दरवर्षी पत्र आम्ही देतो, तर कंपनी पैसे नाही असे सांगते. नियमाप्रमाणे तारसा गावा कंपनीने 15-20 लाखाचे काम करणे गरजेचे आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. प्रकल्प धारकांनी सांगितले की सहा महिन्याने येऊन मी स्वतः या बाबीवर चर्चा करून योग्य मार्ग काढण्याचा प्रयत्न राहील. |

18) **श्री महेश कलारे, माजी सरपंच चाचेर गाव-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावर सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनाव समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | अल्ट्राटेक या कंपनीच्या गाड्या रामटेक, मौदा चाचेर मार्गाने जातात, आमच्या गावात ठिकठिकाणी त्या उभ्या असतात. त्यामुळे गावात अपघात. कंपनीने वेगळी पार्किंग जागा नियोजित करावी. गावातील रस्ते, नाल्या यांचे नुकसान, याबाबत कार्यवाही. अन्यथा चाचेर गावातून एक्ही गाडी जाऊ देणार नाही. गावास सीएसआर निधी उपलब्ध करण्यात यावा, अन्यथा चाचेर मार्गे एकही गाडी जाऊ दिली जाणार नाही, | सूचनांची नोंद घेण्यात आली असुन कंप प्रशासनामार्फत सदर बाबींवर लवकरात लवक कार्यवाही करण्यात येईल. |
| 2) | प्रकल्पबाधित गावांप्रमाणेच चाचेर गावातील शेतींचे नुकसान होत आहे. उत्पादन क्षमता कमी झालेली आहे. चाचेर गावची समस्या कोणत्याच लोकप्रतिनीधीनी जाणून घेतली नाही. | |

19) **रफिज शेख, पर्यावरण पत्रकारः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | पर्यावरणाचा फोरम आहे,जे बोलू शकत नाही, त्यांच्याबद्ल मांडतो. मी जनावरे, पशूपक्षी यांच्याविषयी बोलणार आहे, ज्यांचा अधिकार आहे, पण ते बोलू शकत नाही. येथे काही शेतात आम्हांला हरिणांची मोठी संख्या दिसली. म्हणजे येथे वन्यजीव आहे हे येथे सिध्द झालेले आहे. मी गेले तीन दिवस बघतो, तर प्रकल्पाच्या बाजूस हरिणांचे कळप दिसतात. | सूचनांची नोंद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| 2) | रेल्वेसाईडिंगवर खूप झाडे आहेत. त्या झाडांवर पक्षी मोठ्या प्रमाणात दिसले. त्याचे संवर्धन करणे आवश्यक आहे. कंपनीच्या जिओ टॅगींचा रेकॉर्ड वनअधिका-याकडे नाही. प्रकल्प विस्तार करा, पण अधिसूचनेतील निर्देशांचे पालन करण्यात यावे. | सूचनांची नोंद घेण्यात आली असुन, शासनाने नेमुन दिलेल्या अधिसूचनेतील निर्देशांचे पालन करण्यात येईल. |
| 3) | त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सांगितले की जनावरांशी जसे वागतात, तसेच कंपनी प्रशासन हे स्थानिक लोकांबरोबर, कंपनीतील कामगारांबरोबर क्रुरतेने वागत आहे. तसेच परिसरातील भूगर्भातील पाणी हे दुषित झालेले असुन त्याबाबत विशेष काळजी घेण्यात यावी. .येथे पशूपक्षी आहेत, येथे प्राण्यांचा दवाखाना आहे. आपण माणसांसाठी काही केलेले नाही, तर जनावरांसाठी काहीतरी करावे. बाहेरिल मुलांना apprenticeship मिळते, मात्र येथील मुलांना मिळत नाही. जल, जमीन, जंगलबाबत धोरण राबवावे, कंपनी प्रशासन लोकप्रतिनिधीच् या पत्रांना उत्तर देत नाही, तर कंपनीचे उत्तरदायित्व ठरवून द्या. पर्यावरण संवर्धन समितीत किती बाहेरिल लोकांचा अंतर्भाव आहे, तर त्यास यांचे उत्तर नकारात्मक होते. तरी माणूसकी जपा. | सूचनांची नोंद घेण्यात आली. प्रकल्पात शिकाऊ उमेदवार होते, त्यातील चारजणांनी अभ्यास काल पुर्ण केलेला असून अजून तीन आहेत, ते 10 कि.मी. परिघातीलच आहेत. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की अर्ज देण्यात यावा, जशी प्रकल्पात गरज असेल, त्याचप्रमाणे संधि देण्यात येईल. आमच्या उद्योगाचे 56 प्रकल्प आहेत. आमच्या प्रकल्पात योग्यतेनूसार व आवश्यकतेनूसार स्थानिकांना प्राधान्य देण्यात येते. तरी स्थानिक गरजुंनी अर्ज करावा, येथे नाही तर दुस-या प्रकल्पात नोकरी देण्याच प्रयत्न करण्यात येईल. चांगले सूचना करण्यात आली. पर्यावरण संवर्धन समितीमध्ये स्थानिक बाहेरिल लोकांचा अंतर्भान करणेबाबत. तर त्याबाबत व्यवस्थापनाशी चर्चा करुन पुढील सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल. |

20) **श्रीमती नंदा गोपाल लोहकरे, राहणार-तारसा,तालुका-मौदा, जिल्हा-नागपूरः-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| 1) | 2022 ला महिलांसाठी येथे प्रशिक्षण घेण्यात आलेले होते. महिलांना सक्षम व सबलीकरण करण्यासाठी. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्रही देण्यात आलेले होते. महिलांना काम देण्याचे आश्वासन देण्यात आलेले होते. आजपावेतो महिलांना काम देण्यात आलेले | प्रकल्प प्रवर्तक यानी सांगितले की जर महिलांना काम देता आले नाही तर त्या प्रशिक्षणाचा काय फायदा आहे? कंपनीमध्ये वापरण्यात येणाऱ्या गणवेश हा स्थानीक महिलांकडून शिवून घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. असे प्रशिक्षण द्या की येथील महिला त्यांनी शिवलेले कपडे |

| | | |
|---|---|---|
| | नाही. त्यांना कचरा वेचणे, झाडांचा पालापाचोळा उचलण्याचे काम देण्यात येते. एखादी शिकलेली महिला असेल, तिला काम दिले जात नाही. महिलांना सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण दिले हे योग्य आहे. मात्र महिलांना अजूनपर्यंत शिलाई मशिनसुध्दा देण्यात आलेले नाही, ती सीएसआर मध्ये देण्याचे आश्वासन दिलेले होते, तरी याची नोंद घेण्यात यावी व प्रमाणपत्राबरोबर रोजगा-याच्या संधिबाबत सांगण्यात यावे. | नागपूरला जाऊन विकू शकतील. मी शिल मशिन्स देण्याबाबत माहिती मिळवितो, म प्रशिक्षणाबरोबर महिलांना स्वावलंबी करणे आपली जबाबदारीच आहे. |

21) **श्री राहूल बावने, राहणार-मिशदखेडा, जिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावण समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| | लॉजिस्टीकचे लोक आमच्या गावात गाड्या लावतात. अल्ट्राटेक त्याची पार्कींग आमच्या या गावाला देता का, त्यामुळे आमच्या गावात भांडणे होत आहेत. यासाठी आमच्या गावात मारामा-या होत आहेत. बेजबाबदार कर्मचा-याने असे उत्तर दिले की तुम्हांला जी कारवाई करायची ती करा. आमच्या गावाच्या मैदानात गाड्या लावतात, आपला मार्ग हा चाचेर ते कन्हान हा रुट लोकेशन नसतानाही गाड्या नेत आहेत. रसत्याची क्षगता आहे दहा टन, गाड्यांची क्षमता असते 30-35 टन. हा मुद्दा लक्षात ठेवावा, दहा दिवसात कारवाई झाली नाही, तर अन्यथा निसतखेडा चाचेरतर्फे दहा दिवसात कंपनीत आंदोलन करु हे लक्षात ठेवा | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावण समिती यांनी सांगितले की या मुद्द्याची दखल ह आर.टी.ओ. व पोलिस विभागामार्फत घेण्यात यावी. |

22) **श्री संजय सत्यकार, कन्हान, तालुका--पारशिवणी, जिल्हा-नागपूर**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | सकाळपासून या जनसुनावणीत विविध विषयांवर चर्चा सुरु आहे. माझी पहिली हरकत आहे ती नोंद करावी की जरी आचारसंहिता असल्याने तो विषय व्हायला नको होता.<br>2013 ला जी जनसुनावणी झाली, त्यावेळी श्री रेड्डी होते, त्यावेळी चर्चेले विषय आता दहा वर्षांनी परत चर्चिले गेले. त्यावेळी गावाला चर्चेत सहभागी करुन घेतले होते. 10 कि.मी परिघाताली सर्व ग्रामपंचायतीस ईआयए अहवाल हा उपलब्ध करण्यात आलेला होता. आता मात्र फक्त तीन ग्रामपंचायतींना दिली याची नोंद घेण्यात यावी. सर्व ग्रामपंचायतीस ईआयए अहवाल उपलब्ध करणे योग्य होते. | सदर बाबीमध्ये समन्वयक यांनी सांगितले की, या प्रकल्पाची 30 दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द केलेली होती. त्यामध्ये नमुद ग्रामपंचायतीमध्ये प्रकल्पाबाबतचा अहवाल स्थानिकांना अभ्यासनासाठी ठेवण्यात आलेला होता. यावर आपर्यंत कुठलाचा आक्षेप प्राप्त झालेला नाही. |
| 2) | ज्या कंपनीने हा ईआयए अहवाल तयार केला, त्या कंपनीच्या प्रतिनिधीने सादरीकरण करणे आवश्यक होते. उद्या या विषयाला अनुसरुन आम्ही कोर्टात गेलो, तर ही विषय यायलाच पाहिजे, तरी याची नोंद घ्यावी. .येथे प्रकल्प प्रवर्तकांनी सादरीकरण केले. श्री रेड्डी यांनी हिन्दीत सांगितलेले आम्हांला नीट ऐकू आले नाही. महाराष्ट्र राज्याची भाषा अधिकृत्त भाषा ही मराठी आहे. | सदर सादरीकरण हे प्रकल्प प्रवर्तकांनीच सादर केलेला आहे. |
| 3) | या कंपनीने गेले दहा वर्षात एकही रिपोर्ट जाहिर केली नाही. गेले दहा वर्षे पीकांचे काय नुकसान या कंपनीमुळे झाले याची नोंद अहवालात नाही. कृषि विभागाकडून त्याबाबत सर्वेक्षण व अहवाल उपलब्ध झालेले नाही, याची नोंद घ्यावी. दहा वर्षात दहा कि.मी. परिघात किती पीकांचे नुकसान | सूचनेची नोद घेण्यात आली. |

| | | |
|---|---|---|
| | झाले, त्या ना पीकांमुळे किती शेतक-यांनी आपला जीव गमावला याबाबत माहिती उपलब्ध होणे आवश्यक होते. कंपनी प्रशासन ही गोष्ट कधिही सांगणार नाही | |
| 4) | पुढच्या सहा महिन्यात या प्रकल्प उत्पादनामुळे शेतपीकांवर काय परिणाम झाले यासाठी समितीव्दारे अहवाल तयार करणार, त्या समितीत स्थानीक ग्रामपंचायतीचे प्रतिनिधी, स्थानिक तज्ज्ञ यांना घेऊन अहवाल प्रकाशित करणार आहोत. दहा वर्षात तशी समिती गठित झाली नाही याबाबत काहीही माहिती प्रकाशित करण्यात आलेली नाही | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| 5) | पॉवर प्रकल्पानंतर सिमेंट प्रकल्प हे सर्वात जास्त प्रदूषणकारी प्रकल्प आहेत. मात्र याबाबत एकही अहवाल प्रकाशित करण्यात आलेला नाही. समजा मान्य केले की कंपनीच्या डस्टमुळे पीकांची वाढ झाली. उपस्थित महिला ताई कंपनीमुळे उत्पादन घट झाली हे खोटे सांगते का? कारण कंपनीस शेतीविषयक काहीही देणे-घेणे नाही. शेतक-यांना कसे संपायचे हेच कंपनीचे धोरण आहे. | प्रकल्प धारकांनी असे सांगितले की, विद्यमान प्रकल्पामध्ये धुळीकणांचे नियंत्रण करण्याकरीता 42 बॅग फिल्टर बसविण्यात आलेले असुन प्रस्तावित प्रकल्पामध्ये सुध्दा नियमाप्रमाणे बॅग फिल्टर बसविण्यात येतील, जेणेकरून प्रदूषण कमी होण्यास मदत होईल. तसेच बॅग फिल्टर पेक्षाही सुधारीत तंत्रज्ञान असल्यास ते सुचविल्यास ते ही बसविण्यात येईल. |
| 6) | मी मोठ्या जबाबदारीने हे विधान करतो की येथील सिमेंट स्वतः मालक वापरत नाही. आपले घर बांधाण्यासाठी सिमेंट हे आयात केले जाते. कंपनी अधिकारी स्वतःच्या घरासाठी हे सिमेंट वापरत नाहीत. आपल्याला सांगितले जाते की शेतीवर दुष्परिणाम होत नाही.<br>कंपनीच्या उत्पादन क्षमता विस्तारिकरणामुळे येथील लोकांना श्वासावर परिणाम होणार आहे | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| 7) | कंपनीने गेले दहा वर्षात किती प्रकल्पबाधित गावातील लोकांना कायमची नोकरी दिली. तर उत्तर आहे प्रकल्प बाधित गावातून एकही व्यक्तीस कायमची नोकरी नाही. कंपनीने | सदर बाबीमध्ये नियमाप्रमाणे रोजगार देण्यात आला असुन पुढेही देण्यात येईल, असे प्रकल्प धारकाने सांगितले. |

| | | |
|---|---|---|
| | स्थानिकांना कायमची नोकरी दिली नाही, कारण कंपनीचे कारनामे हे लोकांना कळतील. | |
| 8) | दहा वर्षापूर्वी कंपनीस पाठिंबा मी स्वतः दिला ही चुक आहे. पर्यावरणविषयक जनसुनावणी झाल्यानंतर पर्यावरण अनुमती नाकारली असे कधिही झालेले नाही. स्थानिकांना जगण्याचा हक्क नाही का. | सूचनेची नोद घेण्यात आली. |
| 9) | सदरहू जनसुनावणीच्या इतिवृताची प्रत स्थानिकांना उपलब्ध करुन द्यावी. | सदर जनसुनावणीच्या इतिवृताची प्रत ही म.प्र.नि. मंडळाच्या संकते स्थळावर उपलब्ध राहील. |

23) **श्री शामराव लोहबरे, राहणार-तारसा, जिल्हा-नागपूरः-**

| अनु. क्रं. | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| 1) | आमचा शेतात जाण्याचा रस्ता बंद करण्यात आला. बाहेरुन रस्ता तयार करण्याचे आश्वासन. पाणी व्यवस्था शेतासाठी वचन. काहीही केले नाही. शेतात येणारे पाणी कंपनीने बंद केले, आज माझी शेती कोरडवाहू झालेली आहे. शेतात पुर्णपणे कंपनीचा डस्ट येतो व आहे. याबाबत त्वरित कार्यवाही करावी. माझ्या शेताची पाहणी करा, नंतर जनसुनावणी घ्यावी. अन्यथा कंपनीसमोर आत्महत्या करण्यास तयार. | प्रकल्प धारकाने सांगितले की, याबाबत एक आवड्यात नूकसानभरपाईचे आश्वासन दिले असून रस्त्याबाबतचा मुद्दा हा कधिच आला नाही. सहा महिन्यात येऊन परत तपासणी करण्यात येईल. |

सदस्या, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा समारोप करताना सांगितले जनसुनावणीत मुख्यतः खालील मुद्दे उपस्थित झाले –

1) प्रकल्प प्रवर्तकांनी कंपनी दहा वर्षापूर्वी सुरु झाल्यापासून जे आक्षेप, तक्रारी कंपनीविरुध्द करण्यात आला, त्याबाबत कंपनीने केलेली कार्यवाही सादर करावी,
2) कंपनीने मागच्या जनसुनावणी दिलेल्या आश्वासनांचे अनुपालन झालेले नाही.
3) कंपनीतील कामगार कायद्याचे उल्लघन, किमान वेतन नियमांचे उल्लंघन याबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला,

4) प्रकल्पातील उत्पादन प्रक्रियेमुळे परिसरातील शेतपीकांवर मोठ्या प्रमाणात परिणाम झाल्याचा आक्षेप उपस्थित करण्यात आला.

5) प्रकल्पात येणारा कच्चा माल व उत्पादन वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत आहे.

6) बैठकीत सामाजिक सुरक्षेबाबत स्थानिकांनी मुद्दे उपस्थित केले.

7) महिलाच्या रोजगारासंबंधी महत्वाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला – पूर्ण परिसर हा सुपीक व ओलिताखाली होता, मोठ्या प्रमाणत बागायती शेती, मिरचीची शेती होत होती. कंपनीच्या प्रदूषणामुळे शेतीच्या पीकउत्पादनात घट झाली, त्यामुळे महिलांचा रोजगार कमी झाला.

8) स्थानिक लोकांनी उपस्थित केलेले मुद्दे व त्यासाठी उपस्थित केलेल्या मागण्या याची नोंद घेण्यात आलेली आहे.

9) बैठकीत सर्वच उपस्थितांकडून वाहतुकीच्या समस्या, कंपनीच्या गाड्यांचे बेजबाबदारपणे वाहने चालविणे, नियमांपेक्षा जास्त क्षमतेच्या मालाची वाहतुक करणे, झालेले व संभाव्य अपघातामुळे होऊ शकणा-या जीवित हानीबद्दल तीव्र भावना व भिती व्यक्त करण्यात आल्या.

10) मंजूर उत्पादन क्षमतेपेक्षा कंपनी जास्त प्रमाणात उत्पादन करते त्यामुळे सुध्दा प्रदूषणात वाढ झाल्याची तक्रारवजा सूचना उपस्थित करण्यात आल्या.

11) मा. अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प प्रवर्तक यांनी त्यांचे म्हणणे (Say) पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस त्वरित सादर करावा,

सदस्या यांनी मत मांडले की बैठकीत स्थानीकांनी केलेल्या मागण्यांना प्रकल्प प्रवर्तकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळालेला असेलही, बैठकीत उपस्थित करण्यात आलेले विचार, सूचना किवा आक्षेप यांची नोद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल व सदरहू इतिवृत्त, प्राप्त लेखी सूचना व त्यास प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे, सुधारीत पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या मंजूरीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पर्यावरण व वातावरणीय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा समारोप करताना सांगितले प्रस्तावित प्रकल्प विस्तारिकरण, पर्यावरण योजना याबाबत चर्चा झालेली आहे. इतर राहिलेले मुददे हे वैयक्तिक आहेत. तरी संबंधित व्यक्तींनी त्यांच्या मागण्या उद्या सध्याकाळपर्यंत नागपूर येथील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयात सादर करण्यात यावेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी यांनी सर्व उपस्थित लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी, पोलिस प्रशासन, कंपनी व्यवस्थापन यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

जनसुनावणी दरम्यान प्राप्त झालेले १७ सूचना,आक्षेप सोबत जोडलेले आहेत (**सहपत्र-५**).

**(अतुल सातफळे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी, नागपूर-2
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर

**(सौ. हेमा देशपांडे)**
सदस्या,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नागपूर

**( सुभाष चौधरी)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी,नागपूर जिल्हा-नागपूर